**भारत - सर्बिया परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत - 9 वी फेरी (25 मार्च 2026)**

25 मार्च 2026

भारत आणि सर्बिया यांच्यात 25 मार्च 2026 रोजी बेलग्रेड, सर्बिया येथे परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतची 9 वी बैठक पार पडली. या बैठकीचे अध्यक्षपद भारतीय बाजूने परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) राजदूत सिबी जॉर्ज आणि सर्बियाच्या वतीने परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे राज्य सचिव श्री. दामजान जोविच यांनी भूषवले.

2. सचिव (पश्चिम) यांनी सर्बियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री महामहीम मार्को ज्युरिक यांचीही सदिच्छा भेट घेतली. त्यांनी भारत आणि सर्बिया यांच्यातील विद्यमान सहकार्य अधिक दृढ करण्याच्या, तसेच द्विपक्षीय सहकार्याची व्याप्ती विस्तारण्याच्या मार्गांवर चर्चा केली.

3. भारत आणि सर्बियामध्ये घनिष्ट आणि मैत्रीपूर्ण संबंध आहेत. ज्याचा आधार दोन्ही देशांतील जनतेमधील दीर्घकालीन मैत्रीचे ऋणानुबंध आहेत. या सल्लामसलतीमध्ये व्यापार आणि आर्थिक संबंध, संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, फिनटेक, कृषी, संस्कृती आणि नागरिक परस्पर संबंध यांसारख्या परस्पर हिताच्या क्षेत्रांसह विद्यमान द्विपक्षीय संबंधांचा सर्वसमावेशक आढावा घेण्यात आला. उभय बाजूंनी बहुपक्षीय मंचांवरील आपल्या मजबूत सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

4. उभय बाजूंनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांचे आदानप्रदान केले.

5. या भेटीदरम्यान, सचिव (पश्चिम) यांनी सर्बियामधील परदेशस्थ भारतीय सदस्यांशी संवाद साधला.

**नवी दिल्ली**

25 मार्च 2026